RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना/सुधारित आदेश/बिरवाडी/महाड/२०२० दिनांक : २५ /०५/२०२०.

**वाचले:-**

**१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
**२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
**३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४**
**४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६**
**५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
**६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०**
**७. तहसिलदार महाड यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-५/कोविड-१९/२०२०, दिनांक २९/४/२०२०**
**८. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना/बिरवाडी/२०२०, दिनांक २९/४/२०२०.**
**९. तहसिलदार महाड यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-५/Containment Zone /२०२०, दिनांक १५/५/२०२०.**

---

**सुधारित आदेश,**

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ८ कडील आदेशान्वये रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील बिरवाडी येथे १ कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

**प्रभाग क्रमांक ५ मधील १. गणू सावंत मार्ग ते मधले आवाड येथील ज्ञानेश्वर मंदीराकडे जाणारा रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग मधला आवाड टाकी कोंड, २. ज्ञानेश्वर मंदीराकडून अंतर्गत रस्ता ते जुना बैठक हॉल पर्यंत,३. जुना बैठक हॉल ते गजानन नथु सोलम मार्ग येथील महाड-मांघरुण मुख्य रस्ता हा परिसर.**

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील विषाणू बाधित व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तिंचा कारोना चाचणी अहवाल निगेटिव्ह आला असून सदर व्यक्तिंचा १४ दिवसांचा होम कॉरंटाईन कालावधी पूर्ण झालेला आहे. तसेच अन्य कोणत्याही व्यक्तिला संसर्ग झाल्याचे आढळून आलेले नसल्याचे तहसिलदार महाड यांनी कळविले आहे. तसेच Containment Zone साळवी कॉमप्लेक्स बिरवाडी या इमारती पुरता लागू करण्यात यावा व उर्वरित क्षेत्र बफर झोन झाहिर करण्याबाबत विनंती केली आहे.

**त्याअर्थी, वरील वस्तुस्थिती व तहसिलदार महाड यांचे दि.१५.०५.२०२० चे पत्र विचारात घेता, मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, संपूर्ण साळवी कॉमप्लेक्स, बिरवाडी ता.महाड हे क्षेत्र Containment zone (कोरोना विषाणू बाधित क्षेत्र) व प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित करित आहे.**

**उपोद्घातातील अ.क्र.८ कडील आदेशन्वये Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले प्रभाग क्रमांक ५ मधील १. गणू सावंत मार्ग ते मधले आवाड येथील ज्ञानेश्वर मंदीराकडे जाणारा रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग मधला आवाड टाकी कोंड, २. ज्ञानेश्वर मंदीराकडून अंतर्गत रस्ता ते जुना बैठक हॉल पर्यंत,३. जुना बैठक हॉल ते गजानन नथु सोलम मार्ग येथील महाड-मांघरुण मुख्य रस्ता हे क्षेत्र Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रातून वगळण्याबाबतचे आदेश देत आहे.**

**या कार्यालयाकडील आदेश दि.२९/०४/२०२० मधील इतर निर्देश व घाषित करण्यात आलेल्या Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रासाठी दि.२९/०४/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देश/सूचना हे साळवी कॉम्प्लेक्स, बिरवाडी, ता.महाड या इमारतीसाठी कायम राहतील.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी, रायगड
Collector of Raigad

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी कर्जत यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार खालापूर यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी खालापूर यांना पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, खालापूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, खालापूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, खालापूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**